


ॐकार झांजे
पाहिले न मी तुला
साहित्य प्रतिष्ठान






# पाहिले न मी तुला

ओंकार अशोक झांजे

ई साहित्य प्रतिष्ठान





# हे पुस्तक विनामूल्य आहे

# पण फ़ुकट नाही

हे वाचल्यावर **खर्च** करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.

## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

# पाहिले न मी तुला

## लेखक : ओंकार अशोक झांजे

ओंकार अशोक झांजे

मु. ढालकाठी पो. बिरवाडी

ता. महाड जि. रायगड

402 302

संपर्क 7770099295

ईमेल omkar.zanje1@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

# प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

www. esahity. com

esahity@gmail. com

Whatsapp: 7710980841


APP : https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity.

www. esahitybooks

**प्रकाशन : २२ जानेवारी २०१८**

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ईसाहित्य - प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे.





अर्पणपत्रिका


सर्वांत प्रिय असे माझे आई-वडील,

माझ्या बहिणी

आणि माझे सर्व प्रेमळ नातेवाईक

यांना हे पुस्तक अर्पण !

-ओंकार झांजे





# मनोगत



सर्व वाचकांना माझा सप्रेम नमस्कार!

माझं पहिलं पुस्तक 'ओंली 2050' ला खूप चांगला प्रतिसाद मिळत आहे. त्याबद्दल सर्वांचे आभार!!

आज 'प्रेम' या विषयावरची हि कथा तुमच्यासाठी..

या कथेचे नायक नायिका आहेत पियुष आणि प्रिया ! एक सुप्रसिद्ध कॉलेज.. त्यातील गमतीजमती.. दिल दोस्ती दुनियादारी.. कॉलेजमधला एक मोठा इव्हेंट आणि त्यातले अफलातून किस्से.. पियुष आणि प्रिया यांची एक अबोल प्रेम कथा.. सोबत मालवणी आगरी भाषेचा फ्लेवर.. आणि बरंच काही..


तुम्हाला ही कथा नक्कीच आवडेल अशी मला खात्री आहे. फक्त प्रतिक्रिया कळवायला विसरू नका!!

धन्यवाद.

- ओंकार झांजे

संपर्क 7770099295

ईमेल omkar.zanje1@gmail.com





# प्रकरणं

1 नवे सेमिस्टर

2 कबड्डी

3 त्याची कविता

4 नेने करंडक

5 ईटी आणि एल आय सी

6 नवीमैत्रीण

7 रायगड प्रदक्षिणा

8 चिठ्ठी

9 ट्रेजर हंट

10 चोरी चोरी चुपके चुपके


11 पहिली भेट

12 ट्रेजर हंट - 2

13 एक ईमेल

14 नेने करंडक विजेता

15 पाहिले न मी तुला





या कथेतील सर्व पात्रे व घटना पूर्णपणे काल्पनिक असून त्यांचा वास्तवाशी काहीही संबंध नाही. संबंध आढळल्यास तो निव्वळ योगायोग समजावा.

या कथेत तीन कथा आहेत. त्या जरी वेगवेगळया असल्या तरी एकमेकांत गुंफ़लेल्या आहेत.

# १ नवे सेमिस्टर

"बदलून गेलंया सारं...

पिरतीचं सुटलंया वारं...

आल्लड भांबावलंया बिल्लोरी पाखरु न्यारं...

आलं मनातलं या वटामंदी... "

श्या..

फालतू गाणं

पियुष ने पटकन गाण बदललं.


हम्म...

आत्ता कसं

"सो बेबी पुल मी क्लोज़र,

इन दी बैक सीट ऑफ़ योर रोवर"

काय ही इंग्लिश गाणी,





प्रिया मनातल्या मनात पुटपुटत होती.

असं म्हणत तिने गाणं बंद केलं.

"चला माणगाव उतरणारे", कंडक्टरची हाक आली.

गाडी 15 मिनिटे नाष्टयाला थांबली. प्रिया गाडीतून उतरली. वातावरणात थोडी थंडी होती. झाडांना नुकतीच पालवी फुटलेली. वसंत ऋतू नुकताच बहरलेला.

पियुष खेडेकर चिपळुणचा राहणारा.

कॉलेजनिमित्त तो महाडला आत्याकडे राहत होता.

एक सेमिस्टर संपल्याने तो सुट्टी संपून पुन्हा कॉलेजला चालला होता.

अखेर त्याच डेस्टिनेशन आलं - "महाड".


प्रिया नाष्टा करून पुन्हा गाडीत बसली.

अलिबागची प्रिया जाधव महाडला इंस्ट्रुमेंटेशन मध्ये डिप्लोमा करत होती.

अखेर तिची एस. टी. महाड ला पोहोचली.

आणि ती तिच्या आजीच्या घरी पोहोचली.

महाड मधील 'नेने विद्यालय' हे रायगड मधील प्रसिध्द डिप्लोमा कॉलेज होते. त्याची कीर्ती सर्वदूर पसरलेली. म्हणूनच सर्वजण तिथे शिकायला येत.








पियुष त्यापैकीच एक. एक हुशार विद्यार्थी म्हणुन आल्याआल्या फर्स्ट सेमिस्टरलाच त्याची इलेक्ट्रिकल च्या कट्ट्यात चर्चा होती. दिसायला सावळा, सडपातळ, हसरा चेहरा. पियुषची स्ट्रॅटेजी सिंपल होती. आपण भले आणि आपले काम भले.

त्यामुळे तो अभ्यासावरच आपले लक्ष फोकस करत असे. अखेर कॉलेज सूरु झालं. फर्स्ट सेमिस्टर संपल्याने एव्हाना मित्रमैत्रिणींचें चांगले ग्रुप पडलेले.

"हाय प्रिया", अनु.

अनु ही प्रियाची बी एफ एफ.

ती इथली लोकलाइट होती. महाड जवळच्याच बिरवाडी गावात अनु पवार राहायची.





"हाय अनु, बोल कशी आहेस ? " प्रिया

"मी एकदम मजेत, तू ?"

"मी ही... ".

बरं मी तुला इन्विटेशन द्यायला आलेय, आमच्या घरी सत्यनारायणाची पूजा आहे त्यासाठी.

बरं! मी येइन नक्की. चल आता लेक्चरला जाऊया.

"काय आल्या आल्या लेक्चर नुसतं ?" तू पण ना पियुष.

अरे साहिल... चल!

पियुषचा बी एफ एफ साहिल. दोघांच्या आवडीनिवडी एकच होत्या. पण स्वभाव जरा भिन्न.


"बरं बाबा, लेक्चर वेड्या, चल लेक्चरला".

आज पहिलाच दिवस असल्याने हार्डली तीनच लेक्चर झाले.

"चल मी चाललो " अनु प्रियाला म्हणाली

"अगं चाललो काय चाललो, मी चालले म्हण तू काय पोरगा आहेस "प्रिया

"ए बया गप आमच्याकडं असंच बोलतात, चल मी जातो आता घरी बाय' अनु





" बरं बाय"

पियुष देखील परतला.

"कसा गेला आजचा दिवस दादा?"

हा पप्पू, आत्याचा मुलगा. सहावीला होता.

"मस्त होता बघ. .. "

"आत्या कुठे गेली रे ?"

ती ब्राह्मण सभा हॉलला गेलीये. कसलातरी सेल आहे. तिकडेच गेलीये.

हम्म...

"मी आलो फ्रेश होऊन", पियुष.


पप्पू ने टीव्ही ऑन केला आणि गाणी सुरु केली

"जब से तेरे नैना मेरे नैनो से लागे रे "

तोच बाथरूम मधून आवाज आला

"पप्पू ही भंगार गाणी बदल आधी" पियुष

"मी नाही जा" पप्पू किंचाळला





# 2 कबड्डी


इकडे कॉलेज संपल्याने अनु एसटी स्टॅन्डवर येऊन बसची वाट बघत बसली. आज बस स्टॉप रिकामा रिकामा होता. तिला समोर एक मुलगा दिसला चेहरा ओळखीचा वाटला. हो तो अक्षय होता.

अक्षय मूळचा कोल्हापूरचा. त्याला EnTC ला ऍडमिशन मिळालेलं. तो पट्टीचा कबड्डी प्लेयर होता. कोल्हापूरचा असल्याने रांगडा गडी होता. त्याने गेल्या सेमच्या स्पर्धा गाजविल्या होत्या. अनु सुद्धा खोखो खेळाडू होती. तिच्यामुळे च इंस्ट्रुमेन्टेशन (यापुढे Instru) ला स्पोर्ट्समध्ये चॅम्पियनशिप मिळालेली.

दरवेळी इलेक्ट्रिकल, Instru आणि EnTC यांच्यातच टफ फाईट असे. EnTCची चॅम्पियनशिप अक्षयच्या एका पॉइंटने हुकली. स्पोर्ट्स प्लेयर असल्याने अक्षयचे मित्र त्याला अनुच्या नावाने चिडवायचे. एव्हाना अख्खा EnTC चा वर्ग अक्षयला अनुच्या नावाने ओळखत होता.

शेवटच्या मॅचला अक्षयची रेड होती. Instruच्या वर्गात काही जणांना कुणकुण होती अक्षयला चिडवतात त्याची. Instru वर्सेस EnTC मॅच होती. शेवटच्या रेडला Instru च्या काही मुलांनी ओरड केला..

"अनु आली अनु आली.. "






कबड्डी खेळताना आजूबाजूच्या लोकांमुळे आधीच भारावलेलं वातावरण असतं.

गेलं गेलं गेलं.. संपलं सगळं..

अक्षयची टीम हरली.

तिथून अख्खं कॉलेज आता अनु आणि अक्षयला एका वेगळयाच कारणाने ओळखू लागलं. अक्षयच्या मनात आत्तापर्यंत काहीच नव्हते. पण त्या मोमेंटला त्याचं लक्ष्य असं कसं हटलं त्याचं त्यालाच माहीत नव्हतं...

हो तोच अक्षय आज इतक्या महिन्यांनी बस स्टॉपवर दिसला. त्याने अनुला स्माईल दिली अनूला काय रिॲक्शन द्यावी हे कळत नव्हते. तिने जबरदस्तीने देतात तशीच स्माईल दिली. इतक्यात तिची एसटी आली. काही कळायच्या आतच ती गर्दीत नाहीशी झाली. गर्दीतून हळूच तिने खिडकीच्या कोपऱ्यातून बाहेर पाहिले. तो अजून तिथेच होता आज त्याच्या चेहऱ्यावर वेगळेच भाव होते.





# ३ त्याची कविता

'कुणीतरी असावी सगळ्यांपेक्षा खास

जिच्या नावाने आपल्याला चिडवले जावे

तिच्या आठवणीने चेहऱ्यावर हलकीशी स्माईल यावी

नसताना ती आसपास विचारांचे काहूर उठावे'

नाकावरचा चष्मा वर करत कविता फळयावरची कविता वाचत होती. हिची ओळख करून द्यायची गरज नाही. होईल ती आपोआप!

"किती भारी कविता करता ह्यो पोरगो" कविता म्हटली


"कविता कित्या वाचत बसलस पॉवर सिस्टीमचा लेक्चर असा चल " पियुषने तिच्या डोक्यात टपली मारली

"तुझ्या मालवणात अशा नसतात काय कविता, येवढी इम्प्रेस झालीस ते " पियुष

"मग ह्यो कवी खयचो असा " कविता

"पुण्याचा असा. कबीर तेचा नाव, कॉम्प्युटरमध्ये शिकत असा" पियुष

“चल आता लेक्चराक.”






दोघेही वर्गात केले. घरून मोठी सुट्टी खाऊन आल्याने आता कॉलेज बोरिंग वाटू लागले होते.

सगळे घरी आले.

'कुणीतरी येतली जिचा नाव घेऊन तुका चिडवतले

कुणीतरी अशी येतली जिका आठवून चेहऱ्यावर हसू येतला'

आज बऱ्याच दिवसांनी कविताने आपल्या डायरीत मालवणी कविता लिहिली.






# 4 नेने करंडक

आज नेने कॉलेजला एक महत्त्वाचा दिवस होता. दरवर्षीप्रमाणे सामाजिक उपक्रम राबवण्याचा मोठा कार्यक्रम असायचा- नेने करंडक! यासाठी कॉलेजमधले वेगवेगळ्या डिपार्टमेंटचे ठरविक ग्रुप केले जात. नेनेच्या वेगवेगळ्या वर्गातल्या टॅलेंटेड मुलांनी नाव देऊन टाकली. आज यादी जाहीर होणार होती. प्रिया आणि अनु अगदी नऊच्या काट्यावर कॉलेजच्या LCD च्या इथे येऊन पोहोचले. त्याच्या आधीच सर्व जण येऊन पोहोचले होते. सगळे LCD कडे डोळे लावून बसले काऊंट डाऊन झाला

3.. 2.. 1..

ओह नो..

ग्रुपची नावं बघून सर्व चकित झाले. यावेळी नियम बदलला होता. सगळे डिपार्टमेंट मिक्स केले होते आणि सर्व गुण लक्षात घेऊन ग्रुप पाडले होते. चार जणांचे दोन गट पडले होते. कवितासुद्धा हताश होती. पुढे नावे झळकली होती..





टीम रायगड-

प्रिया Instrumentation रायगड

अक्षय EnTC कोल्हापूर

कविता इलेक्ट्रिकल सिंधुदुर्ग

साहिल इलेक्ट्रिकल रायगड

टीम राजगड-


अनु Instrumentation रायगड

पियुष इलेक्ट्रिकल रत्नागिरी

कबीर कॉम्प्युटर पुणे

अंकीता EnTC सातारा

सगळेच हादरून गेले. पण आता काय जे आहे ते एक्सेप्ट करण्याशिवाय पर्याय नव्हता. सगळेजण माना खाली घालून परतले. सिलेक्ट न झालेले प्राचार्यांना शिव्या घालत होते. कॉलेजच्या कँटीन पेक्षा बाहेरचा नाना नानी कट्टा जाम फेमस होता. या हॉटेल चे मालक आगरी होते. आज मात्र कट्टा उदास वाटत होता.





नाना- आज पोरा येकदम गप गप बसलीन.

नानी- हं. . क झालं क मायती.

नाना- त्यांचे मुलं आपला कट्टा जाम गप गप वाटतंय.

नेहमीप्रमाणे सर्वजण आपापल्या मित्रांसोबत वेगवेगळे बसले होते. पण ह्यावेळी त्यांचा एकमेकांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला होता. तसे विविध क्षेत्रात झळकलेल्या सर्वांचे नाव नोटीस बोर्ड वर येत असल्याने सगळे नावाने एकमेकांना वरच्यावर ओळखायचे. पण आता ही ओळख आणखी घट्ट झाली तीही या अशा धक्क्याच्या स्वरूपात! दुर्देव म्हणजे जवळचे मित्र विरुद्ध गटात होते. प्रिया-अनु, साहिल-पियुष, कविताला ज्याच्या कविता आवडायच्या तो कबीर, अक्षयला ज्याच्या नावाने चिडवायचे ती अनु..

एक नवीन मेंबर यात आला. सातारची पोलीसाची पोरगी अंकिता जी अक्षयच्या वर्गातच होती. प्रत्येक इव्हेंटसाठी जसे आपण व्हॉट्सप्प ग्रुप तयार करतो तसेच आज दोन ग्रुप तयार झाले. टीम रायगड आणि टीम राजगड.. पुढच्या नोटीस एलसीडीवर झळकणार होत्या. टीमच्या मेंबरची एकमेकांशी ओळख व्हावी यासाठी मध्ये खूप वेळ दिला होता. त्यानंतर कामे जाहीर होणार होती.

# 5 ईटी आणि एल आय सी

"कोणतं लेक्चर आहे बरं.. "timetable वरून बोट फिरवत प्रिया शोधत होती.

'LIC- लिनीयर इंटिग्रेटेड सर्किट'

अनु- अगं आज सरांनी LIC चं पुस्तक आणायला सांगितलेलं

प्रिया- हो यार शीट चल फास्ट

"पियुष, इकडे आहे मी" साहिलने हाक मारली

"इथे काय करतोयस" पियुष


"दिसत नाय काय पेपर वाचतोय"

"बरं मी आलोच मला एक पुस्तक शोधायचंय"

"कुठलं ?"

"मशिन्ससाठी रे "पियुष म्हणाला

पियुष इलेक्ट्रिकच्या खणामध्ये पुस्तक शोधू लागला. बराच वेळ शोधल्यावर त्याच्या चेहऱ्यावर स्माईल आली.





'इलेक्ट्रिकल टेक्नॉलॉजी बी एल थरेजा व्हॉल्युम 2' (ईटी) हेच सांगितलं होतं सरांनी मशीन्स वन विषयासाठी. असं वाटतय एकच कॉपी आहे. हट यार.. आता हे दुसरीकडे ठेवावं लागणार. जर एखाद्या विषयाची पुस्तके एकदम कमी असतील तर ती पुस्तके दुसऱ्याच डिपार्टमेंटच्या रॅक मध्ये ठेवायचे. कारण तिकडे कुणी शोधत नाही मग आपल्यालाच पुस्तक मिळतं. ही आयडिया काही मुलांना माहीत होती. पियुष त्यापैकीच एक!

पियुषने गुपचूप पुस्तक दुसऱ्या ब्रांच च्या रॅकमध्ये नाव दिसणार नाही असे उलटे ठेवले आणि तो निघाला.


"मी आले पुस्तक घेऊन तू थांब इथेच" प्रिया अनुला म्हणाली


" बरं " अनु

प्रिया LIC चं पुस्तक शोधू लागली.

याच्यामारी टोपी भेटत का नाही यार हे पुस्तक..

इतक्यात तिची नजर त्या उलट्या ठेवलेल्या पुस्तकावर गेली. तिने ते बाहेर काढले.







इलेक्ट्रिकल टेक्नॉलॉजी (ईटी) हे पुस्तक तर आम्ही गेल्या सेमला वापरलेल. इथं कुणी ठेवलं असेल ? पुस्तक लपवायची आयडिया प्रियालाही माहीत होती. तिने एक वहीचा कागद फाडून त्यात लिहीले..

"बाळा तुझी जागा इथे नाही. आपल्या जागी परत जा. तुझं इथं काय काम !"

आणि ही चिठ्ठी त्या पुस्तकात ठेवली. पुस्तक पहिल्यासारखा ठेवलं.

कोण तो शहाणा असेल त्याला टोला मारण्यासाठी तिने हे केलं.

अथक प्रयत्नानंतरही तिला LIC ( Linear Integrated Circuit) पुस्तक नाही भेटलं. तेव्हा तिच्या डोक्याची ट्युब पेटली. ती पटकन दुसऱ्या ब्रांचच्या कपाटाकडे गेली. पहिल्यांदा जिथे कोणी जायचे चान्सेस कमी तिकडे गेली पॉलीमरचा रॅक. खालच्या कप्प्यात तिला LIC चं बुक मिळालं. आपल्याच वर्गातल्या कुणीतरी शहाण्यांनी हे लपवले तिला माहित होतं.


पुस्तक घेऊन प्रिया बाहेर आली.

"काय गं किती वेळ" अनु चिडलेली

"तुला सांगते चल"

"राहु दे तुझं तुझ्याकडेच" अनु

चला कॉलेज झालं एकदाचं! अनु प्रिया गेटपाशी आल्या. अनु गेटकडे वळणार इतक्यात कुणाचा तरी जोरदार धक्का तीला लागला.





"ए यडपट दिसत नाय काय तुला बावळट साला"

अनुने रागाने पाठी वळून पाहिले. एक सुंदर मुलगा समोर होता. थोडा धष्टपुष्ट, कानात बाळी, गोरापान, डोळ्यावर गॉगल, ब्लॅक टी शर्ट आणि कार्गो पँट. सॉरी सॉरी सॉरी तो खूप वेळा सॉरी म्हणत होता. पण त्याच्या बोलण्याकडे तिचं लक्ष नव्हतं. ती त्याच्याकडे एकटक बघतच होती..

तिकडून पियुष आणि कविता गप्पा मारत येत होते. त्यांनी हे पाहिले.

पियुष मस्करीत म्हणाला

"बघ तुझो तो कबीर त्यान काय नवीन आयटम काढलीन असा वाटता"

"र मेल्या तू गप्प रव रे" कविता लाजत म्हणाली

पियुष जोर-जोरात हसू लागला

प्रियाने एक जोरात टपली मारली अनुच्या डोक्यात. "आई ग " ती विव्हळली.

"अगं गेला तो कधीच' प्रिया म्हणाली

" बरं ते सोड तू येतेस ना आज पूजा आहे आमच्याकड"


"हो आहे माझ्या लक्षात पण मला चेंज करून यावे लागेल "

"मग तू माझ्यासोबत चल आजीच्या घरी

मग निघू आपण "

" अगं मग माझी एसटी चुकेल"

" त्यानंतर नाही का मग?"





"आहे पण साडेसहाला डायरेक्ट रामदास पठार "


"मग तिच्या ने जाऊ की"

"ओके" खांदे उडवत अनु म्हणाली

केशरी सदरा, पांढरा लेहंगा आणि केसाची लांब वेणी घालून प्रिया सोज्वळपणे तयार होऊन आली. त्या दोघी महाड एसटी स्टँड वर आल्या. थोडा काळोख पडला होता. अखेर त्यांची बस लागली. अनुने प्रियाला पुढेच बसायला सांगितले. कॉलेजची मुलं थांबली होती. त्यांची खूप गर्दी होती.

एसटी सुरू होऊन दहा मिनिटे झाली होती. प्रियाचा रुमाल हातातून निसटला. ती रुमाल उचलायला पहिल्या सीटवरून खाली वाकली. तिचे लक्ष अनावधानाने शेवटच्या सीटवर केले. तिच्या भुवया उंचावल्या. मागच्या सीटवर काही प्रेमी जोडप्यांची कारस्थाने चालू होती. ती कॉलेजमधलीच मुलं मुली होती. तिला एकदम कसेतरी वाटले. आणि रुमाल पटकन उचलून ती सीटवर बसली. तिच्या चेहऱ्यावरून अनुला सर्व कळले. पण ती रोज प्रवास करत असल्यामुळे या सगळयाची तिला सवय झाली होती. अखेर अनुचं घर आलं. कंडक्टरने बेल दिली. दोघी उतरल्या. दरवाजा धाडकन आदळला.. प्रिया थोड्या वेळासाठी स्तब्ध झाली.. सत्यनारायणाची पूजा व्यवस्थीत पार पडली. त्यानंतर अनुच्या पप्पांनी प्रियाला घरपोच केले.

प्रिया आजचा दिवस कधीच विसरणार नव्हती. तिने नाईट लॅम्प बंद केला आणि LIC च पुस्तक बंद करून डोळे मिटले..



# 6 नवी मैत्रीण

EnTC डिपार्टमेंटची आज पालक सभा होती. सगळे जण वर्गात गोळा झाले. अंकिता एकटीच बसली होती. कारण तिचे पोलीस वडील ती लहान असतानाच वारले होते. तिच्या आईला शेतीची कामं सोडून पाटण वरून एवढ्या लांब येणं शक्य नव्हतं. तिला बालपणीच्या आठवणी डोळ्यासमोर दिसू लागल्या.

"अंकीता साळुंखे तुम्ही बाहेर जाऊ शकता" सरांनी तिला बाहेर काढलं. अक्षयलासुद्धा बाहेर काढलं.

"हाय अक्षय"

"हाय काय ग तु हितं कशी काय तुझं पप्पा न्हाई आलं का" अक्षयने विचारलं

"अर माझं बाबा या जगात न्हाईत" अंकिता नाराज झाली

"सॉरी" अक्षय

"असू दे पर येक सांग तू हिकडं काय करतुईस "

"त्याच काय हाय की माझे वडील पोलीस होते आणि मी लहान असतानाच ते वारले "

दोघांनाही एकमेकांच्या भावना कळत होत्या. दोघांनी आपला मोर्चा नाना नानी कट्ट्याकडे वळवला. कॉलेजच्या कॅन्टीन पेक्षा या कट्ट्यावरच मुलं जास्त असत. कारण या हॉटेलचे मालक नाना नानी बोलायला एकदम चंगाळ असले

तरी आतून मात्र एकदम चांगले होते. आगरी होते ना म्हणूनच.. अक्षय आणि अंकिताने चहा मागवला.

"बालू जा त्या घाटी पोराना च्या देऊन य"

घाटी शब्द ऐकल्यावर अंकिताच्या डोक्यात झिणझिण्या आल्या.

"हितली लोकं आपल्याला घाटी म्हणत्यात मला लय राग येतो बघ "अंकिता चिडून म्हणाली

अक्षय- तर काय अन म्हणत्यात कोकणी लोक साधी भोळी

अंकिता - असं कोण बोललंय

अक्षय- अगं आपल्याला कविता नाय का होती. . एका कवीने भारताचं वर्णन केलंय त्यात लिहिलंय कि कोकणी माणसं फणसासारखी अस्त्यात.

बाहेरून काटेरी आनी आतून गोड.

अंकिता- म्हंजी तुला बी तसं वाटतय व्हय?


बोलता बोलता तिच्या हातातून चहाचा कप निसटला आणि तो फुटून काचा विखुरल्या. . नेमका तिचा पाय त्यावर पडला आणि ती जोरात किंचाळली..

तोच नानी धावत आल्या.

"काय ग पोरी जरा हलू पी च्या, कप फोरलास तो फोरलास पुन तुला लागला कती, रगत यतय, बघू"

असं म्हणत त्यांनी पटकन तिला मलमपट्टी केली.

ती नानींकडे बघतच बसली.





थोड्या वेळाने अंकिता नॉर्मल झाली. इतक्यात तिकडून तो हँडसम मुलगा आला कविता करणारा. कॉम्प्युटरचा हो तोच पुण्यातला कबीर.


"काकू उपीट आहे का" पुणेरी शैलीत त्यानं विचारलं

"नाय बा, इकर उपमा न पव नाय भेटत, ते फक्त तुमचे पुण्यानूच भेटतान, वरापाव हाय"

पुण्यातल्या या उपीट च्या जोकवर कट्ट्यावर हशा पिकला.

"एक वडापावच द्या मग काय करणार " कानात पुन्हा इयरफोन टाकून कबीर टेबलकडे गेला. पालकसभा संपली आणि कॉलेजही सुटले. अक्षय आणि अंकिताने एकमेकांना बाय केले आणि ते आपापल्या वाटेला निघून गेले.

Whatsapp group सुरुवातीला शांत होते. मग Gm Gn ला सुरुवात झाली. त्यानंतर हाय हॅलो. एकमेकांचं नाव-गाव इंट्रोडक्शन वगैरे वगैरे.. टीम मधल्या लोकांची वरचेवर तर तोंड ओळख झाली पण सोबत काम करताना त्यांचे पटणार का यावर शंका होतीच. ग्रुप वर मेसेज आला एक फेब्रुवारीला पहिला टास्क जाहीर होणार आहे. ही ॲक्टिव्हिटी दरवेळेस प्रमाणे एका महिन्याची न ठेवता वाढवून तीन महिन्यांची केली आहे. दोन निळया टिक आल्या म्हणजे सर्वांनी message वाचले. खरं तर काही जण व्हाट्सअप वर नव्हते.






# 7 रायगड प्रदक्षिणा

1 फेब्रुवारी चा दिवस उजाडला. आज पहिलं काम जाहीर होणार होतं. सगळे गट वेळेवर एलसीडी च्या समोर हजर झाले. रिंगटोन वाजली आणि समोर मेसेज आला..

पहिले टास्क 'रायगड प्रदक्षिणा' दिनांक 19 फेब्रुवारी. सगळ्यांनी एकमेकांकडे भुवया वर करून बघितलं. कारण दर वर्षी एखाद्या जवळपासच्या गावात स्वच्छता अभियान, वृक्ष लागवड असे सोपे उपक्रम असायचे. पण या वेळेस जरा वेगळंच होतं. मुलांची परीक्षा जवळ आल्याने मध्ये काही दिवसांचा गॅप ठेवला होता. जो गट प्रदक्षिणा सर्वात आधी पूर्ण करेल तो गट पहिल्या फेरीचा विजेता होणार होता.

पहाटे चार वाजता रायगड प्रदक्षिणेला सुरुवात होणार होती. शिवाय 19 फेब्रुवारी म्हणजे शिवजयंती किल्ले रायगडावर मोठा जल्लोष असणार होता. नेने करंडकाचे यावर्षीचे बदललेले नियम पाहून सर्वांना आधीपासूनच आश्चर्याचे धक्के बसत होते. त्यात आता हा आणखी एक. त्यामुळे आता जे आहे ते आहे असं म्हणत सगळे निघाले आणि अभ्यासात मग्न झाले. शेवटी परीक्षा ही तितकीच महत्त्वाची होती

परीक्षेचे दिवस निघून गेले. 19 फेब्रुवारी तारीख आली. दोन्ही टीमा संपूर्ण तयारीनिशी रायगडाच्या पायथ्याशी पहाटे चारच्या आधीच पोहोचल्या. त्यांचं परिक्षण करायला एक शिक्षकांची टीम होती. चार वाजता शिटी वाजली आणि दोन्ही टीमचा प्रवास सुरू झाला.. रक्त गोठवणारी थंडी पडली होती. शिवाय





भयानक काळोख होता. सगळे एका रांगेत एकमेकांच्या जवळ जवळ राहून चालत होते. रायगडाच्या पायथ्यापासून चारही बाजूंनी गोल प्रदक्षिणा घालायची होती. दोन्ही गट थांबत-थांबत दरमजल करत एकामागोमाग चालत होते. अधून-मधून चित्रविचित्र प्राण्यांचे आवाज येत होते तेव्हा सगळयांना घाबरायला होत होतं. 2 तास उलटून गेले. सूर्याची किरणे दिसू लागली


पाखरांची किलबिल सुरू झाली. तितक्यात कुणीतरी बोललं.. "ए. . तो बघा राजगड किल्ला " अंधुक प्रकाशात दूरवर छोटेसे डोंगराचे टोक दिसत होते. तो राजगड किल्ला होता. सगळयांनी तो पाहिला. लगेच टीम राजगड ओरडू लागली.. टीम राजगड जिंदाबाद..

हे ऐकून टीम रायगड पण कशी मागे राहील. तेही घोषणा देऊ लागले. शिवजयंतीनिमित्त रायगडावर कार्यक्रमाला सुरुवात झाली. सर्वांनी माना वर करून रायगडाकडे पाहिले. लक्ष्य मशालीने त्याचे कडे उजळून निघाले होते



आणि दूरवर बाहेर निघालेले भयावह टकमक टोक दिसत होते. हळूहळू अंधार नाहीसा झाला. गडावरच्या ढोल ताशांचा आवाज खाली स्पष्ट ऐकू येत होते.

एकेकाचा स्टॅमिना कमी होत चालला होता. कारण सलग एवढे तास चालायची सवय कुणालाच नव्हती. त्यात अक्षय आणि अनु खेळाडू असल्याने थोडे






फिट होते. अजून काही तास चालत गेल्यानंतर अखेर ती वेळ आलीच. सर्वांनी सरळ वर पाहिले. आकाशाच्या मध्यभागी टकमक टोक अगदी मध्यभागी दिसत होता. हवेतील गारवा अजून कमी झाला नव्हता. पानांवर दवबिंदू जमा झाले होते. टीम राजगड थांबली. तर दुसरी टीम पुढे निघून गेली चार-पाच तास उलटून गेले.

"बास झाला बाय आता माका काय चालवत नाय" असं म्हणत कविता खाली बसली.

सगळयांनी डोक्याला हात लावला. तिला सरबत देण्यात आला. सर्वांनी तिला खूप समजावलं आणि धीर दिला. एवढ्यात खूप मागे असलेला पियुष चा गट राजगड पुढे निघून गेला. वाटेत करवंदांची तसेच फणसाची खूप झाडं होती. सर्वांनी चविष्ठ फळांचा आस्वाद घेत रमत गमत प्रवास केला.

गट रायगडचे एकेक मेंबर कमजोर पडू लागले. साहिलचे पण पाय दुखू लागले. एकटा अक्षयच पुढे चालत होता आणि थोड्या अंतरावर प्रिया होती. दुसरी टीम खूपच पुढे निघून गेली. त्यांनी वाघोली खिंड ओलांडली. अजून पुढे गेल्यानंतर त्यांना रोपवेने लिफ्ट वर जाताना दिसली. जवळजवळ 75% प्रदक्षिणा पूर्ण झालेली. त्यांच्या चेहऱ्यावर समाधान झळकले. तोच अंकिता चक्कर येऊन पडली. हिला काय झालं आता.. सगळे निराश झाले. तिला शुद्ध येई पर्यंत आणि विश्रांती घेईपर्यंत अर्धा तास निघून गेला. आणि दुसऱ्या टीमचा घोषणांचा आवाज दुरुन येत होता. सर्वांनी त्याकडे दुर्लक्ष केले.

चालत-चालत अखेर पुन्हा ते पहिल्या पॉइंटला आले. समोर बघतात तर काय टीम रायगड त्याच्या समोर!! त्यांची प्रदक्षिणा आधीच झालेली !! पण हे कसं शक्य आहे ? नंतर कळलं की काहीच छोटे रस्ते फक्त साहिललाच माहीत होते आणि त्यामुळेच ते आधी पोहोचले.






अशाप्रकारे पहिले टास्क संपले. प्रिया, अक्षय, कविता, साहिल जल्लोष करू लागले. सगळे खूप आनंदी झाले. राजगड टीम जरा अपसेट झाली पण ग्रुप वर सगळ्यांनी डिसाईड केलं की आता काही झालं तरी आपणच पुढची फेरी जिंकायची.

कॉलेजच्या फलकावर रायगड 1 राजगड 0 असे नमूद करण्यात आले.

पुढची नोटीस आली की पुढचं काम 1 मार्चला देण्यात येईल. एव्हाना कॉलेजची गॅदरिंग सुरू झाली. दरम्यान सलगच्या सुट्ट्या असल्याने सगळे होस्टेलर गावाला जाऊन आले. अगदी अक्षय, कबीर आणि अंकिता सुद्धा घरी गेले.

बऱ्याच दिवसांनी घरी गेल्याने हा महिनाही कसा संपला कळलेच नाही.





# 8 चिठ्ठी

पियुष लायब्ररीत जाऊन पुन्हा ईटीचं पुस्तक शोधू लागला. त्याला ईटीचं पुस्तक ठेवलेल्या जागी मिळालं. त्यातला मेसेज त्यानं वाचला. तोच जो प्रियाने लिहलेला. त्याने त्याच्या खाली पुन्हा लिहिलं. .

"माझं काम तुझ्याशी नाही तू तुझं काम कर"

आणि अभ्यास झाल्यावर त्याने पुन्हा पुस्तक रॅकमध्ये ठेवलं. प्रिया लायब्ररीत एलआयसीचं पुस्तक परत करायला आली. सहज गंमत म्हणून तिने आपण लिहिलेली चिठ्ठी पाहायला गेली. आणि तिला तो मेसेज दिसला. तिने वाचला. ओव्हरस्मार्ट हा ह्याला बघतेच आता म्हणत तिने खाली पुन्हा काही वाक्य लिहिली..

"ओय मिस्टर अखडू जास्त भाव खाऊ नको नाहीतर पाठविन ढगात"


पुस्तक लपवणारा कोणतरी अखडू मुलगाच असेल म्हणून तिने हवेत तीर मारला आणि तो बरोबर पियुषला लागला. कोणीतरी नाटकी मुलगी दिसते. हिची जिरवतो बघ आता कशी.. बहुतेक सुंदर मुली नखरे करणाऱ्या असतात (सर्वच नाही) असा त्याचा समज.. त्यामुळे त्यानेही हवेत तीर मारला..

"असशील दिसायला खूप सुंदर म्हणून तोरा मिरवु नको

तुला काय वाटलं तु एकटीच स्मार्ट आहेत "

याला कसं कळलं आपण दिसायला सुंदर आहोत प्रिया गोंधळली. पियुषचा बाणही बरोबर लागला. हा मला ओळखतो की काय तिने पुन्हा लिहिलं..

"आय डोंट नो यू सांग आता कोण आहेस तू "





पियुषचा पुन्हा रिप्लाय..

"लागली का तुला घाई एवढी

प्रेमात पडली की काय वेडी"

टाईमपास म्हणून त्याने दिलं ढकलून. सुरुवातीला दोघांनाही या चिठ्ठीत काहीच इंटरेस्ट नव्हता. म्हणून जस्ट गंमत म्हणून एक दोन आठवड्यांतून जसा वेळ मिळेल तसा एकमेकांना ते मेसेज पुस्तकातून करत. त्याच ईटी च्या पुस्तकातून. असे बरेच आठवडे उलटुन गेले. दोघांनाही आपण किती हुशार आहोत ते कळालं. शेवटी त्यांनी एकमेकांना भेटायचं ठरवलं. नक्की इतका रोमँटिक, इतकी सुंदर, इतका मस्त लिहिणारा, इतकी भारी अक्षर असणारी आहे तरी कोण याची उत्सुकता दोघांनाही लागली होती. दोघांनीही स्थळ आणि वेळ ठरवलं आणि पुस्तक ठेवलं पुन्हा एकदा त्या कोपऱ्यात !

पियुष आंघोळ करून बाहेर आला. कुणीतरी tv चालूच ठेवला होता आणि ते पण मोठ्या आवाजात गाणी लावून..

"तबसे दिवाना हुआ
सबसे बेगाना हुआ
रब भी दिवाना लागे रे"

गाण्याच्या या ओळींवर पियुषने ठेका धरला. याआधी पियुषला हि रोमँटिक गाणी अजिबात आवडत नव्हती पण त्या गाण्यावर तो वेड्यासारखा डान्स करत होता

' जबसे तेरे नयना '

इतक्यात त्याचा टॉवेल सुटला पण नशीब घरात कुणीच नव्हतं हुश्श...

# 9 ट्रेजर हंट

महिन्याचा पहिला दिवस आणि पुन्हा दोन्ही टीमा ऑडिटोरियममध्ये जमा झाल्या. प्रत्येक गोष्ट धक्कादायकच होणार आहे असा समज प्रत्येकानेच आता करून घेतला. त्यामुळे पुढे काहीही झालं तरी आता पर्वा नव्हती. अखेर रिंगटोन वाजली. कबीरने गॉगल काढला आणि वाचू लागला पुढचा उपक्रम..


' ट्रेजर हंट' होय ट्रेजर हंट.. महाड तालुक्यातील काही ठिकाणांशी संबंधित कोडी होती. ती सोडवून शेवटच्या चिठ्ठीपर्यंत पोचायचे होते आणि शेवटच्या क्लू पर्यंत जो आधी जाईल तो गट विनर होणार होता.

गणितात M1 100 पैकी 100 गुण मिळवलेली अंकिता टीम मध्ये असल्याने हि फेरी आपणच जिंकणार याची टीम राजगडला खात्री होती. दहा दिवसांनी पहिलं कोडं प्रदर्शित करण्यात आलं. .

**"एक विशाल तलाव त्याच्या तळाशी चौदा विहिरी गोल गोल**

**स्पर्श करा प्रत्येकाने पाणी माझे गोड गोड "**







हे कोडं दिसताच आठही जणांनी पाऊल उचललं आणि पटकन धावत सुटले.

"गाडी काढ पटकन" पियुष साहिलला म्हणाला

"सॉरी यु आर नॉट इन माय टीम" साहिल

"तुझ्या *** **" पियुषच्या तोंडातुन शिवी बाहेर पडली

"पियुष कम हिअर" कबीरची बुलेट तयार होती.

इतर सगळे ही वाऱ्याच्या वेगात पळाले. सगळयांनी त्या ठिकाणी धाव घेतली..

चवदार तळे. . डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पाण्याच्या सत्याग्रहामुळे प्रसिद्ध झालेले चवदार तळे..

सगळे शोधाशोध करू लागले. तळयाच्या मधोमध असणाऱ्या पुतळयाखाली दोन चिठ्ठ्या होत्या. दोन्ही टीमला त्या सोबतच मिळाल्या आणि त्यासोबत पुढचा क्लू मिळाला. .

**"सूर्यास्ताच्या वेळी उजळून निघतो मी एरवी असतो नुसता अंधार**

**सांगतो मी पुराणकथा नाव माझे ' _ _ र' "**

कवी असलेला कबीर यमक जुळवू लागला... अंधार कंधार मंदार केदार गद्दार गांधार.. हे ऐकताच अनु जोरात ओरडली.. गांधार- 'गांधार पाले'

"अग ओरडलीस कशाला त्यांनापण क्लू कळला ना" पियुष तिच्या अंगावर खेकसला. उंच डोंगरावर असलेल्या आणि विविध पुराणकथा कोरलेल्या

बौद्धकालीन लेण्या म्हणजेच 'गांधार पाले' अंकिताच्या डोक्यात उशिराने ट्यूब पेटली.

एव्हाना दुसरी टीम म्हणजेच रायगड कधीच निघून गेली.



"ओय कसला विचार करतेस चल पटकन" कबीर अंकिता वर ओरडला. चौघेही बाईकवर स्वार झाले. खूप कष्टाने सर्वजण डोंगर चढले.

मोबाईलच्या टॉर्चने आत काळोखात चिठ्ठी शोधू लागले. बाराव्या लेणीच्या शिल्पामागे चिठ्ठी भेटली. टीम रायगड चटकन ती घेऊन पळाली. अक्षय गाडीवर बसणार तोच त्याच्या लक्षात आलं की गाडी पंक्चर झाली ती आपोआप झाली की कुणी पंचर केली या विचाराने अक्षय संतापला आणि त्याने दुसऱ्या टीमचा मुलांच्या गाड्यापण पंचर केल्या. दिवस मावळला. आता उद्या शिवाय पर्याय नव्हता.. टीम राजगड सुद्धा चिठ्ठी घेऊन आली. खाली खूप मोठा राडा झाला.. आतापर्यंतचे BFF एकमेकांच्या विरुद्ध टीममध्ये असल्याने आता भांडू लागले होते.

कॉम्पिटिशन आता तगडी झाली होती. सर्वजण उद्याची वाट बघत होते. एक वाईट घटना म्हणजे ज्या मित्रांनी बाईक दिल्या होत्या त्यांनी पुन्हा बाईक द्यायला नकार दिला आणि गेम अजूनच किचकट झाला.

आपला चष्मा वर कविता पुढची चिट वाचत होती..

**" खुलता कळी खुलेना**

**झुलता पूल झुलेना "**

झुलता पूल. . आता झुलता पूल कुठे आहे रायगडात??

" काय हे साहिल तुच सांग आता "प्रिया म्हणाली

"एक मिनिट मला माहितीये कुठे आहे तो. पण प्रॉब्लेम असा आहे की तिथे कसे जातात मला माहित नाही. कुणाला तरी विचारावं लागेल" साहिल


विरुद्ध टीमनेही कंबर कसली त्यांना स्वतःला सिद्ध करायचं होतं

अनुने उत्तर सांगितलं "मला माहिती आहे हे आमच्या इथून जवळ आहे. वाळण कोंडी खूप खोल घळी आहे पाण्याची तिथे. त्यावरून पूल बांधता नाही आला म्हणून लोखंडाचा झुलता पूल बांधला आहे. तोच झुलता पूल आहे.. "



"मी लहान असतांना तिथे गेलेलो. चला माझ्या घरी मी विचारतो" अनु

तिसरा कोडं सुटलं. सगळेजण त्या पुलावर हजर झाले.. वाळण या गावी.. तिथल्या पडक्या मंदिरात त्यांना पुढची चिठ्ठी भेटली..





**"ऐन थंडीतही मी देतो ऊब**

**शोधताना मला कष्ट घ्यावे लागतील खूप"**

"आता हे काय अजून" साहिलने डोक्याला हात लावला.

"तू नीट विचार कर काय असेल ही गोष्ट" अंकिता विचारू विचार करू लागली.

"वॉटर हिटर, स्वेटर.. " कविता बोलली.

तसा टीममध्ये हशा पिकला.

"तसं नाही गं काही नैसर्गिक आहे का जवळपास जे वर्षभर गरम असतं असं" अक्षय थोड्या वेळानं बोलला.

" ह आहे एक" प्रिया मध्येच म्हणाली

"कोणता" साहिल कंटाळून म्हणाला

"सव.. तिथे गरम पाण्याचे झरे आहेत" प्रिया

" काहीही काय.. मी इतक्या वर्ष इथं राहतोय. मला माहित नाही अजून " साहिल

" खर आहे.. मी एकदा पेपरमध्ये वाचले आहे" प्रिया

"असा असंल तर मग शोधुक व्हया " कविता

टीम राजगड पण गहन विचार करत होती. कारण तिथल्या जवळपासच्या लोकांनाही ते फारसं माहीत नव्हतं. त्या दिवशी अचानक पाऊस पडल्याने सर्व नेटवर्क जाम झाले. आणि नेटचा ऑप्शनही बंद झाला. म्हणजे तो दिवसही गेलाच म्हणायचा. तिसरा दिवसपण असाच गेला.

चौथ्या दिवशी सर्वांनी Google बाबांना विचारलं. .



'Directions To Sav - Hot Water Spring' . .

टिंग वाजले आणि पुन्हा झाला प्रवास सुरु. यावेळी मात्र खूप अडथळे आले. कारण जायला नीट सुविधा नव्हती. दिवस मावळतीला आला. त्यांना नेक्स्ट क्लू मिळाला. पियुषने तो वाचून दाखवला. .

**"एका बाजूला आध्यात्मिक शांतता**

**दुसऱ्या बाजूला कर्णकर्कश आवाज**


**एका बाजूला भक्तीचा सुवास**

**आणि दुसरीकडे हिंस्त्र प्राण्यांचा वावर**

**विचार कराल मनाने**

**तर होईल याचा बोध"**

खूप विचार केल्यानंतर त्यांना उत्तर मिळाले. बैठकीला जात असल्याने अनुच्या डोक्यात ट्यूब पेटली.





'शिवथरघळ' - समर्थ रामदास स्वामी यांचं तिथं आठ वर्षे वास्तव्य होतं. तिथेच त्यांनी पवित्र दासबोध ग्रंथ लिहिला.

टीम राजगडचं उद्या सकाळी जायचं हे फिक्स झालं. कुठून तरी माहिती लीक झाली आणि विरुद्ध पार्टीला कळाली आणि तेही तयार झाले. भल्या पहाटे एसटी पकडून सर्वजण शिवथरघळीकडे निघाले. त्या कोड्यात सांगितल्याप्रमाणेच अतिशय शांत वातावरण होते. एका बाजूला आत गुहेत नीरव शांतता आणि बाहेर विशाल धबधब्याचा प्रचंड आवाज..

व्हॉट्सअप वर मेसेज आला.. उद्या इलेक्ट्रिकलची पॅरेंट मीटिंग आहे आणि परवा महत्वाचे लेक्चर ठेवले आहे त्यामुळे पुढचे दोन दिवस व्यस्त होते.

त्यांना एक चिठ्ठी मिळाली आणि आणखी एक पझल. अक्षय वाचू लागला आणि मटकन खाली बसला ते बघून सगळयांनाच टेंशन आले. त्याच्या हातातून प्रियाने ती घेतली आणि कपाळाला आठ्या आणल्या. सारे मुसळ केरात इकडे... अनुही नाराज झाली. त्यांचे सारे प्रयत्न वाया गेले होते. तसं त्या चिठ्ठीतच लिहिलेलं.


**"घालवले तुम्ही इतके दिवस व्यर्थ**

**कळेल का कधी तुम्हाला याचा अर्थ**

**कारण एकाच ठिकाणी होते हे सर्व**


**म्हणतात ना काखेत कळसा**

**आणि गावाला वळसा "**





सगळेजण उदास मग काय शेवटची एसटी पकडली. सर्वांनी कानात आपापले इअरफोन टाकले आणि सर्व गाणी ऐकत बसले. पुढचे दोन दिवस कॉलेज सुरू होते. दरम्यान विशेष परीक्षक शिक्षक टीमचं त्याच्यावर बारीक लक्ष होतं. सगळे नाराज होते. दिवस बोरिंग वाटू लागले. क्लू भेटला नव्हता. त्याचा दुःख होतंच. पण त्यापेक्षा जास्त सगळी धावपळ केली अगदी फुकट गेली होती. त्याचं वाईट वाटत होतं.





# 10 चोरी चोरी चुपके चुपके

बरेच दिवसानंतर आज सगळयांना मोकळा वेळ मिळाला.

"चल यार पियुष लय बोर झालंय" साहिल म्हणाला

"हो रे पियुष स्पर्धेच्या नादातून कितीतरी दिवसातना आज मोकळा वेळ मिळालाय"

"कुठे यायचं बोल"

"कॅफेत जाऊ रिप अन् डीप"

"ओके चल मग"

दोघेही चालत चालत रिप अन् डीप कॅफेच्या दिशेने निघाले. .

दोघे आत गेले.

आणि समोर बघतात तर काय.. समोरचे दृश्य थक्क करणारे होते.

त्यांच्यासमोर कविता आणि कबीर दोघेजण कॉफी पीत बसले होते. पियुष आणि साहिलला बघताच त्यांचा थरकाप उडाला आणि दोघेही उभे राहिले. कवितांच्या चेह्ऱ्यावरची रिॲक्शन तर पाहण्यासारखी होती.

आपल्या बॉयफ्रेंडसोबत कुणी मित्रांनी पकडल्यावर काय रिअक्शन असते हे ज्यांना अनुभव आहे त्यांनाच माहिती..

त्यात महत्त्वाचं म्हणजे कॅफेत लागणाऱ्या गाण्यांमध्ये नेमकं हे गाणं लागल ते पियुष आणि साहिल च्या एंट्रीलाच.

*"तुने मारी एंट्री दिलमें बजी घंटी यार*


*टन टन टन टन.. "*

इकडे टन टन आणि कविताच्या हृदयात धड धड धड.. !!

आणि जेमतेम दोन तीन मिनिटात सर्वजण एकमेकांकडे बघत उभे होते.

अशाप्रकारे कविताचे भांडे आपल्या मित्रांसमोर फुटले







कविताने घरी आल्यानंतर मोबाईलचा मेसेज बॉक्स उघडला.

"आज त्या पियुषनी आनी साहिल्यानं आपणाक पकडल्यान. उद्यापासून दुसरीकडं भेटूक व्हया. " कविता

" उद्या कुठे भेटायचे मग" कबीर

" करमरकर मिसळ "

"का बरं "

"अरे तुमच्या पुण्यात जशी पुणेरी मिसळ फेमस आहे ना तशी महाडात करमरकरांची मिसळ खूप फेमस आहे तुफान गर्दी असते तिथे आपण तिकडे भेटायचं का"


" ए मंद उलट फेमस ठिकाण म्हटल्यावर तिथे सगळयांची ये-जा असणार तिथं तर आपण पहिले पकडले जाऊ"

"बरं मग दुसरीकडे खय तरी भेटू'

"उद्या दादली पुलावर भेटू"

"डन"

"Bye Gn'





# 11 पहिली भेट

सगळं ठरलं.. 'अमर पेये' मध्ये भेटायचं असं दोघांनीही ईटीच्या पुस्तकातून ठरवलं. ही त्यांची पहिली भेट असणार होती. पियुष आणि प्रिया दोघांनी एकमेकांचे चेहरे पाहिले नव्हते. आज ते कळणार होते. पियुष आज खास तयार होऊन आला होता. निळे चेक्सचे शर्ट आणि जीन्स आणि बॉडी स्प्रे मारून पियुष तयार होता.

"साहिल घरी जाताना मला शिवाजी चौकात सोड"

"का रे काही काम"

" हो अरे एक काम आहे "

"चल मी पण येतो "

"अरे जाईन मी" पियुष अडखळत

"बस काय एवढीच दोस्ती"

"ओके मग चल" पियुष म्हणाला

दोघेही रवाना झाले. दोघांनी एन्ट्री केली तोच त्यांना कविता समोर दिसली. ती मैत्रिणीसोबत लस्सी पीत होती. तिने हात केला. या इकडे या सगळयांना बघून पियुष आणखी उदास झाला. सगळ् पाण्यात गेलं त्याची नजर आजूबाजूला त्या मुलीला शोधत होती.

मी एक मिनिटात आलो. पियुष बाजूला आला आणि तिला शोधू लागला. दूरवर एका कोपऱ्यात त्याला एक तरुणी पाठमोरी दिसली. ती एकटीच बसली होती. पियुष सगळ्यांची नजर चुकवून तिकडे जाऊ लागला.

प्रिया.. कुणीतरी जोरात हाक मारली. त्या तरूणीने शेवटी मागे वळून पाहिले. तिचा गहूवर्ण, गालावरची खळी, मोकळे सोडलेले केस, चेहऱ्यावर अजिबातच नसलेला मेकप, तरीही खुलून दिसणारा चेहरा, जांभळ्या कलरचा लांब कुर्ता आणि वाईट कॉम्बिनेशन सलवार आणि ते छोटेसे डोळे आणि प्रिया नाव ऐकताच क्षणार्धात तिचा चेहरा बदलला.

"ओह गॉड अनु इथं कशी काय आली " जीभ बाहेर काढत प्रिया मनातल्या मनात म्हणाली.


मागून अनु आली तसा पियुष मागे फिरला.

हि ती नाही वाटतं ही मुलगी तिच्या अनुसोबत आली वाटतं.

पियुष पुन्हा आपल्या ग्रुपमध्ये आला. पण तो विचारांत हरवलेला अजून सुद्धा त्याची नजर बाहेरच तिला शोधत होती.

इकडे अनु आणि प्रियाचं खूप मोठा संभाषण झालं. शेवटी प्रियान कसलं तरी तिला कंविन्स केलं आणि तिचा डाऊट दूर केला. दोघींनीही आवडती मँगो मस्तानी ऑर्डर केली. वरची चेरी खात-खात प्रिया विचारात मग्न झाली तो आला की नाही..







अशा प्रकारे पहिल्या भेटीचा सपशेल फिस्कटला. कारण दोघांनाही हे सगळं नवीन होतं. त्यामुळे एकमेकांना पाहण्याचा हा चान्स गेला.

प्रिया कॉलेजवरून घरी आली.

"कसा गेला आजचा दिवस" आजीने विचारले

" मस्त गेला "प्रिया म्हणाली " खूप दमले आजी कॉफी बनवून आण ग आपल्यासाठी"

"हो आता बनवते थोड्याच वेळात "


आजीने 2 कॉफीचे मग आणले. आणि दोन्ही कॉफी प्यायला बसल्या. तेव्हा आजीने नेहमीप्रमाणे रेडिओ सुरू केला. संध्याकाळी आपकी फर्माईश नावाचा कार्यक्रम लागला होता. नेहमीप्रमाणेच सुपरहिट मराठी गाणी त्यावर लागायची.

प्रिया म्हणाली "काय ही जुनी गाणी आजी तुला आवडतात ग"

" प्रिया जुन्या गाण्यांना किती अर्थ होता माहिते का आता हेच गाणे बघ ना "

रेडिओवर पहिलंच हिट गाणं लागलं.

पाहिले न मी तुला, तू मला न पाहिले






ना कळे कधी कुठे, मन वेडे गुंतले ।।

प्रिया ते गाणं ऐकत होती. तिच्या चेहऱ्यावर स्मितहास्य पसरले. जणू ते गाणं तिच्यासाठीच वाजवले होते.

( हे अजरामर गीत ऐकण्यासाठी या लिंकवर जा HTTPS://YOUTU.BE/0I59VEZXR6 )





# 12 ट्रेजर हंट - 2

स्थळ- नाना नानी कट्टा

नाना: चला आज पोराना गरमगरम भज्या बनवू.

नानी: हं.. बरोबर बोलताव.

मेकॅनिक्सचा टॉपर असलेला अक्षय गहन विचारात होता. खूप विचारानंतर त्याचा गुंता सुटला. त्याच्या चेह्ऱ्यावर आनंद पसरला. तो उभा राहिला

"अरे मिळालं" तो मोठ्याने ओरडला त्याने आपल्या टीमला सांगितलं की "मी एकदा प्रिन्सिपलच्या केबिनमध्ये गेलो होतो तेव्हा त्यांच्या केबिनच्या एका बाजूला मोठे दालन आहे. त्यात सर्व जवळपासच्या पर्यटन स्थळांचे फोटो आहेत" सगळयांचे डोळे आनंदाने चमकले. बाजूच्या गटातली मुलं तर त्यांच्या बोलण्यावर टपूनच बसलेली. शेवटी त्यांनाही जिंकायचं होतं. काही कळायच्या आत समोर दोघेजण सुसाट धावताना दिसले.

एक अक्षय आणि दुसरी अनु..


बाकीचे सर्वही कॉलेजकडे जीव तोडून पळत सुटले. प्रिन्सिपलची केबिन जवळ येऊ लागली. अक्षयने बाजूला पाहिले. अनु एकदमत्याच्या बाजूलाच धावत होती. त्यांच्या डोळयासमोर कबड्डीची मॅच आली. मागच्या वेळी हिच्यामुळे आपली चॅम्पियनशिप गेली. आज नाही त्याने चटकन आपला पाय आडवा करत तिच्या

पायात गुंतवला. तिला पाडण्यासाठी पण अनु ही चतुर होती. तिने चटकन त्याला घट्ट पकडले. यामुळे झालं असं की वेगामुळे ते एकमेकांवर आदळले..

अनु आणि तिच्या अंगावर अक्षय. दोघांना एकमेकांच्या स्वतःच्या श्वासाचा आवाज आणि हृदयाची धडधड स्पष्ट ऐकू येत होती आणि एकमेकांच्या डोळ्यात ते गुंतले. जवळजवळ दोन मिनिट उलटली तरी हे असेच. त्यांच्या पाठोपाठ लगेच प्रिया आणि पियुष होते. पियुषने एक मोठी उडी घेतली आणि तो सरांच्या केबिनच्या दारावर धडकला. परमिशन घेऊन तो आत गेला.

तो बाहेर आला ते नाचत-नाचत.. एव्हाना अक्षय अनु सावरले होते. सगळे मेंबर्स तिथं पोचले. पियुषने विनर चिठ्ठी सगळयांना दाखवली. यासोबत टीम राजगडचा मोठा जल्लोष आणि नोटीस बोर्डवर गुण रायगड 1 राजगड 1. .

आता नेने करंडक विजेता ठरण्यासाठी एकच फेरी शिल्लक होती. हे टास्क तब्बल पंधरा दिवसांनी डिस्प्ले होणार होतं. त्यामुळे पुन्हा एकदा कॉलेज सुरू झालं. म्हणजे कॉलेज सुरूच होतं आता या सर्वांचे लेक्चरला जाणं सुरू झालं. ..





# 13 एक ईमेल

अनुला थांबवत अक्षय बोलू लागला.. त्याने आज त्याच्या मनातल्या सगळ्या भावना तिला सांगून टाकल्या. अनु काहीही न म्हणताच निघून गेली.

दुसऱ्या दिवशी त्याच्याजवळ येऊन ती म्हणाली

" तुला सगळे माझ्या नावाने चिडवतात म्हणून तुला असं वाटलं असेल. पण तसं काही नाही आपल्या दोघांत काहीच रिलेशन नाही. ना तू मला आवडतोस आणि मी तुला आवडत नाही असं समज.. "


एका दमात ती सर्व बोलून एका सेकंदात बस स्टॉप वरून नाहीसी झाली. सगळं संपून ती आज थोडं हलकं फील करत होती. अक्षयने ह्यावर खूप विचार केला. शेवटी आपलीच चूक म्हणून आपल्या सर्व भावना दफन केल्या आणि मेलबॉक्स उघडला कारण ती व्हाट्सअपवर नव्हती.

त्यांनी "I am very very sorry" असा मेल तिला केला. तिचा रिप्लाय येणार नव्हता हे त्याला माहीत होतं. तरीही त्याला जसं वाटलं तसं त्यानं केलं.

त्याच्या खांद्यावर कुणीतरी हात ठेवला. अक्षयने मागे वळून पाहिले ती अंकिता होती.

तिने त्याला एक हलकी स्माईल दिली त्याने सुद्धा तिला तशीच स्माइल दिली.

तो दिवस अक्षयसाठी भकास केला. त्याने रात्री सहज व्हॉट्सॲप उघडले व्हॉट्सऍपच्या ग्रुपवर साहिले एक फोटो टाकला होता..





"जेव्हा कुणीतरी तुमच्या आयुष्यात नकळतपणे येतो तेव्हा त्याला जाऊ देऊ नका कारण काहीतरी स्पेशल कारणासाठी तो तुमच्या आयुष्यात आला आहे"


अक्षयने यावर खूप वेळ विचार केला. त्यानंतर त्याने अंकिताला मेसेज केला. थोड्याच वेळात त्याच्या मेसेजच्या रिप्लाय आला. त्याने वाट्सएप उघडले. ते उत्तर ऐकून त्याच्या चेहर्यावरची कळी खुलली. आता त्या दोघांमध्ये काय संभाषण झाले हे वेगळे सांगायला नको. ग्रुपमधली आणखी एक प्रेमकथा बहरली.

कॉलेजमध्ये एका नामांकित प्राध्यापकावर मोठा आरोप करण्यात आला. खूप मोठा मॅटर झाला. कॉलेजच्या इतिहासातील हि एक मोठी घटना होती. त्याचा परिणाम असा झाला की नेने करंडक रद्द झाला आणि फायनल फेरी पुढच्या सेमिस्टरला म्हणजे जुलै महिन्यात घेण्यात ठरलं.

एप्रिल महिना आला तसे सर्व सबमिशन मध्ये बिझी झाले. रात्र-रात्र जागून जर्नल्स लिहिणे, व्हायवाची तयारी आणि मग फायनल पेपरची तारीख तोंडावर आली. जीवतोड अभ्यास करून सगळयांनी पेपर लिहिले.

अखेर सुट्ट्या पडल्या आणि सर्वजण आपापल्या गावी निघून गेले. प्रत्येकजण गावी परतताना बऱ्याच आठवणी घेऊन गेला. सर्वांनाच पुढच्या सेमिस्टरची उत्सुकता होती. शिवाय पियुष आणि प्रियाची पहिली भेटही फिस्कटली होती. त्यामुळे आता परत कधी भेटणार व त्यासाठी कधी पुस्तकात लिहून ठेवायचं याचा विचार करत होते.

उन्हाळी सुट्टी बघता बघता निघून गेली..






# 14 नेने करंडक विजेता

जुलै महिना उजाडला. अधून-मधून पावसाळा पावसाच्या सरी पडत होत्या. एलसीडीवर प्रत्येक ग्रुपसाठी शेवटचे दोन उपक्रम जाहीर झाले.

एक गड स्वच्छता मोहीम &

दोन पाणी आडवा पाणी जिरवा मोहीम.

टीम रायगडला देण्यात आला 'लिंगाणा गड'. जो रायगड किल्ल्यापासून जवळ आहे आणि ट्रेकिंग साठी खूप कठीण आहे आणि याच गडाच्या जवळच्या गावात बंधारा बांधायचा. टीम राजगडला याच तालुक्यातला दुसरा किल्ला 'मंगळगड' उर्फ कांगोरी किल्ला देण्यात आला आणि त्याच्या जवळ असलेल्या गावी बंधारा बांधून समाजसेवा करायची.





हे दोन्हीही सामाजिक उपक्रम होते आणि आणि यावेळेस पूर्ण कॉलेज कमिटी त्यांच्यासोबत होती. एकदम काटेकोर मार्किंग असणार होते. मुसळधार पावसात सर्वजण तयारीला लागले. हि शेवटची फेरी होती आणि नो डाउट ती प्रत्येकाला जिंकायची होती. साफसफाई झाली. दमून भागून आल्यावर सगळयांनी जेवणावर ताव मारला आणि पुढच्या कामाला लागले. अगदी कधीच केले नव्हते एवढे कष्ट सर्वांनी घेतले. टास्क संपले. आता सगळयांचे डोळे निकालाकडे लागले. त्यात आणखीन सस्पेन्स कॉलेजने ठेवला आणि दहा दिवसांनी बक्षीस स्टेजवर जाहीर होणार होते.

आज बक्षीस समारंभ होता. सगळे एकदम कडक ड्रेसिंग करुन आले होते. ऑडिटोरिअम अत्तराच्या वासानी भरला होता आणि निळया लाईट्स चमचम करत होत्या. समोर फिजिक्सच्या देखण्या मॅडम अँकरिंग करत होत्या. सोहळयाला सुरुवात झाली भाषणं पार पडली आणि प्रिन्सिपल सरांनी माईक हाती घेतला. सर्वांचे कौतुक केले. विजेत्यांचे नाव जाहीर करायला एन्व्हलप उघडला.. कविता डोळे मिटून प्रार्थना करू लागली.

" आणि नेने करंडक विजेता आहे..

. गट रायगड.


. प्रिया साहिल कविता अक्षय.. "

सोबत फटाक्यांचा मोठा ब्लास्ट झाला. इकडे टीम रायगडनं जल्लोष सुरू केला आणि स्टेजकडे झेप घेतली.

पियुषची टीम उदास झाली त्यांना रनर अप चे बक्षीस मिळाले.

एक भली मोठे चषक आणि सोबत दहा हजाराचे पारितोषिक घेण्यासाठी अक्षय वगैरे स्टेजवर गेले. ग्रुप फोटोसाठी सगळ्यांनी मोठी स्माईल दिली आणि नंतर एकसाथ ओरडले "जय भवानी जय शिवाजी "

सर्वांनी एकमेकांचे अभिनंदन केले. चला आता विसाव्याला पार्टी. . कार्यक्रम संपल्यानंतर गाडीला खटकन कीक मारत आठही पाखरं भुरकन उडाली. ..





# 15 पाहिले न मी तुला

ऑगस्ट महिन्याचा पहिला दिवस शहरात पावसाने थैमान घातलं होतं. पावसाने आपला भयानक रूप दाखवले. सारं शहर जलमय झालं. सगळीकडे पाणी साचलं. पालिकेने सर्वांना सावधानीचा इशारा दिला. पाऊस येणारे बहात्तर तास विश्रांती घेणार नाही असं सांगितलं गेलं.

पण म्हणतात ना प्रेम आंधळं असतं. आपले हे लव्हबर्ड्स काही ऐकायला तयार नव्हते. पहिली भेट तर फ्लॉप झाली होतीच पण आता दोन ऑगस्टला काही झालं तरी भेटायचं असं दोघांनीही ठरवलं होतं. दोघांनी एकमेकांना ओळखण्यासाठी घालायचा पोशाख आधीच सांगून ठेवला होता. प्रियाने पांढरा शुभ्र सदरा आणि पियुषने काळा टी शर्ट असे पुस्तकातल्या पत्रात म्हटले होते. लोकेशनसुद्धा डिसाईड झाली. शहरापासून दूर सावित्री नदीवरचा जुना पुल क्रॉस करून पलीकडे एक हॉटेल आहे तिथेच भेटायचं तेही रात्री आठ वाजता. दोघांनीही एकदम पक्का केलं. घरी खोटं सांगितलं आणि वेळ मोकळा केला.

पण बाहेर पाऊस थांबण्याचे नाव नव्हतं. शहराला चारी बाजूंनी पाण्याने वेढलेलं. अशातच प्रिया शेजाऱ्याची स्कूटर घेऊन निघाली. गाडीच्या वेगात पावसाचे तोंडावर पडणारे थेंब दगडासारखे भासत होते. वेळेच्या अर्धा तास आधीच ती निघाली.

पियुषने तयार व्हायला खूप वेळ लावला. त्याने निघताना आरशात पाहिले. त्याने एक सेल्फी काढला. तेव्हा त्याला मोबाईलवर वेळ दिसला. खूप वेळ झाला आतापर्यंत निघायला हवं होतं. झटकन तो घराबाहेर पडला आणि घरातली लाईट गेली. बाहेर काळाकुट्ट अंधार आणि विजांचा कडकडाट अत्यंत भयावह

परिस्थिती होती. पण त्यांचाही निर्धार ठाम होता आणि तो शहराच्या बाहेर पडू लागला. लाईट गेली असल्याने सगळीकडे प्रचंड काळोख होता.

त्याने आयुष्यात पहिल्यांदाच इतकी भयानक रात्र आणि पावसाचं विकृत रूप पाहिले होते. दूरवर दिसणारी सावित्री नदी कोपली होती. काठाच्यावर तिचं पाणी चढले. आपलं जाणं खूप धोक्याचे आहे हे त्याला कळून चुकलेलं. कळत होतं पण वळत नव्हतं. निरव शांतता.. तो सावित्री पुलाजवळ आला. त्याच्या पायाखालची जमीन अक्षरशः कोसळली. डोळे भीतीने विस्फारले गेले. अंगावर तीव्र शहारा आला. सावित्री नदीवरचा शंभर वर्षे जुना असणारा ब्रिटिशकालीन पूल वाहून गेला होता. तो कधीही न पाहिलेला नदीचा राक्षसी प्रवाह त्याच्या डोळ्यासमोर होता. जणू मरणच समोर आमंत्रण देत होते. त्याचा तोल गेला आणि जमिनीवर तो धाडकन कोसळला. त्याला समोर सफेद ड्रेसमधली बाय बाय करणारी तरुणी दिसत होती अंधुकपणे..

दोन आठवडे उलटुन गेले. पियुषला हॉस्पिटलमधून घरी परत आणले. तीव्र तापातून तो कसाबसा बरा झाला. पावसाचा जोर ओसरला त्याच्या डोळ्यासमोर अजूनसुद्धा ते दृश्य होते. डोळे पुसत त्याने फ्रेश होण्यासाठी आपली पावले बाथरूमकडे वळवली. तो फ्रेश होऊन बाहेर आला. त्याला कॉलेजला जायचे होते. काही महत्त्वाची कामे राहिली होती. थोडे कष्ट घेऊन तो कॉलेजला पोहोचला. त्याने लायब्ररी गाठली.. त्यात शेवटचं कपाट आणि मग खालचा कोपरा आणि ईटीचं पुस्तक. ..

अरे पण ते तिथे नव्हतंच. . त्याने खूप शोधले पण त्याला पुस्तक पुन्हा कधीच भेटलं नाही.. तो हताश होऊन बाहेर आला. त्याच्या डोळ्यासमोर अजुनही ती तरुणी दिसत होती. सफेद ड्रेस मधली त्याला बाय बाय करत..


# समाप्त



हि कथा तुम्हाला कशी वाटली ते न चुकता कळवा यासाठी फक्त एकच मिनिट घालवा..

Email omkar.zanje1@gmail.com

किंवा Whatsapp 7770099295





विशेष आभार

मालवणी संवाद ~ रोशन मलये, विवेक गावडे


आगरी संवाद ~ प्राजक्ता म्हात्रे

टंकलेखन साहाय्य~ अक्षय दिवेकर

माझ्या पहिल्या पुस्तकाची लिंक-

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/om_li_2050_omkar_zanje.pdf

लवकरच भेटू..






# ई साहित्य प्रतिष्ठान

**मराठी** भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे





जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.

www. esahity. com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail. com ला कळवून मेलने मिळवा. किंवा7710980841हा नंबर सेव्ह करून या नंबरला तुमचे नांव व गांवWhatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा.

किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहे. तेdownload करा.

हे सर्व मोफ़त आहे.